186

अध्ययन अक्षमता (डिसलेक्सीया) असलेल्या
विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाच्या प्रवाहात
आणण्यासाठी उपाययोजना
वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करण्याच्या मुदतीबाबत

**महाराष्ट्र शासन**
शालेय शिक्षण विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण २००४/(१५१/२००४)/प्राशि-५
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२
दिनांक : ७ सप्टेंबर, २००४

पहा :- १) शासन परिपत्रक, शालेय शिक्षण विभाग, क्र. संकीर्ण १०२१/(१५/२००१)/प्राशि-५,
दिनांक २३ सप्टेंबर, २००३
२) शासन परिपत्रक, शालेय शिक्षण विभाग, क्र. संकीर्ण १०२१/(१५/२००१)/प्राशि-५,
दिनांक १३ जुलै, २००४
३) शासन शुद्धीपत्रक, शालेय शिक्षण विभाग, क्र. संकीर्ण १०२१/(१५/२००१)/प्राशि-५,
दिनांक १४ जुलै, २००४

**परिपत्रक** :- संदर्भाधीन क्र. १ व २ च्या शासन परिपत्रकांद्वारे अध्ययन अक्षमता असलेल्या इयत्ता १२ वी पर्यंतच्या शालेय विद्यार्थ्यांना सवलती देण्यात आल्या होत्या. तथापि, अध्ययन अक्षमता (डिसलेक्सीया) असलेल्या विद्यार्थ्यांना द्यावयाच्या सवलतीचा लाभ मिळण्यासाठी जे वैद्यकिय प्रमाणपत्र अपेक्षित असते ते विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यानंतर पालकाकडून आणून दिले जाते व या सवलतीचा लाभ मिळून विद्यार्थ्यांना उत्तीर्ण करावे अशी मागणी पालकाकडून केली जाते. या बाबी सुरळीत होण्याच्या दृष्टीने शासन असे आदेश देत आहे की, इयत्ता १० वी व १२ वी च्या बोर्डाच्या परीक्षेचे फॉर्म भरतांना त्यासोबत अध्ययन अक्षमतेचे वैद्यकिय प्रमाणपत्र विद्यार्थ्यांनी / शाळांनी जोडणे आवश्यक राहील.

२. इयत्ता १ ली ते ९ वी व ११ वी च्या विद्यार्थ्यांना हे प्रमाणपत्र संबंधित प्राथमिक/माध्यमिक शाळांना दिनांक ३१ डिसेंबरपूर्वी सादर करणे आवश्यक आहे. सदर बाब शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी सर्व शाळांच्या निदर्शनास आणण्याची व्यवस्था करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सुजाता कांबळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत, माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित,
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक (माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे
सर्व विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)
ग्राम विकास विभाग/आदिवासी विकास विभाग/सामाजिक न्याय विभाग/सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व जिल्हयांचे जिल्हा शल्य चिकित्सक
शालेय शिक्षण विभागातील सर्व कार्यासने / निवडनस्ती, प्राशि ५.

187

**विद्यार्थ्यांच्या अध्ययन व लेखनविषयक वैगुण्याबाबत (डिक्लेक्सिया)बाबत टिप्पणी**

विद्यार्थ्यांच्या अध्ययन व लेखन विषयक वैगुण्याबाबत (डिस्लेक्सिाया) प्रारंभी दि. २० जुलै १९९५ रोजी मा. प्रमोद नवलकर, परिवहन मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली एक बैठक आयोजि करण्यात आली. या बैठकीत अशा मुलांचे पालक व तज्ज्ञ व्यक्ती उपस्थित होत्या. सदर बैठकीमध्ये पुढीलप्रमाणे निर्णय घेतले गेले.

१) डिस्लेक्सिया या वैगुण्याबाबत उद्बोधन व्हावे म्हणून **जीवन शिक्षण** व **शिक्षण संक्रमण** या मासिकांच्या माध्यमातून माहिती देणे.

२) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे व महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांनी तज्ज्ञांच्या मदतीने डिस्लेक्सिया शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम तयार करावा. या प्रशिक्षणाचा खर्च तपशील मंडळाने तयार करावा.

३) शालेय चित्रवाणी माध्यमातून प्रतिमाह एकवेळ शिक्षकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम निर्मिती व प्रसारण करण्यात यावे.

४) प्राथमिक व माध्यमिक स्तरावर वर्ग अध्ययन व परीक्षेत सवलत देण्यासाठी इ. ९ वी पर्यंत असे विद्यार्थी लेखी परीक्षेत उत्तीर्ण झाले नाहीत तर त्यांची तोंडी परीक्षा घेऊन मूल्यमापन करण्यात यावे.

उपरोक्त निर्णयांच्या कार्यवाहीचा प्रस्ताव तयार करण्यासाठी अध्यक्ष महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली व २० ऑगस्ट १९९५ पर्यंत सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत निर्देशित करण्यात आले. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांनाही अहवाल देण्याचे सूचित करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दि. २१/८/९५ रोजी समितीची बैठक आयोजित करुन पालक व शिक्षकांना डिस्लेक्सिया विषयी माहितीसाठी सविस्तर परिपत्रक शाळांसाठी तयार केले व शिक्षण संक्रमण मासिकातून लेख़ प्रकाशित करण्यासाठी १. प्रा. श्रीधर पाटणकर २. डॉ. लता परांजपे ३. डॉ. डी.एम. रानडे या तज्ज्ञांना सूचना केली. मंडळाने तयार केलेले अभ्यासक्रम व विषय आणि परीक्षा सवलत **अध्ययन अक्षम** मुलांना देण्याबाबतचे परिपत्रक ६/१०/९५ ला शासन मान्यतेसाठी पाठविले. शिक्षण प्रशिक्षणाबाबतची जबाबदारी दोन्ही संस्थांनी डॉ. डी.एच.मेहता, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई

यांच्यावर सोपविली. त्यांनी प्रशिक्षण कार्यक्रम प्रस्ताव ९ जानेवारी १९९५ ला शासनाकडे पाठविला.

डॉ. पद्मजा गोडबोले यांनी लेख तयार करुन पाठविला. इतरांचे लेख वेळीच मिळालेले दिसत नाहीत. मात्र त्यानंतर सदर विषयांवर शिक्षण संक्रमण व जीवन शिक्षण या मासिकांमधून पुरेसे लेखन प्रकाशित झालेले आहे.

अ.शा.पत्र क्र. व्हीएसएस-१०९९/(२७१) प्राशि २ दि. १०/५/९९ अन्वये मा. प्रमोद नवलकर, मंत्री, सांस्कृतिक कार्य, राजशिष्टाचार व दारुबंदी कार्य यांच्या पत्राचा संदर्भ देऊन मंदबुद्धि मुलांना सर्वसाधारण शालेत शिकताना परीक्षेला लेखनिक देण्याबाबत अभिप्राय मागविण्यात आले. परिषदेच्या अभिप्रायानुसार लेखनिक नेमणे व पात्रता ठरविण्याचे निकष देण्यात आले. तथापि केवळ पालकांच्या कथनावर अवलंबून न राहता वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे अशी सवलत द्यावी. व त्यासाठी सक्षम समिती असावी असे शिक्षण संचालनालयाने सुचविले. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने वैद्यकीय प्रमाणपत्र देण्याची सुविधा सक्षम समिती अस्तित्वात नाही असा खुलासा केला. त्यानंतर शिक्षण संचालनालयाने दि. २०/९/९९ व १५/११/९९ अनुसार पाठविलेली अ.शा.पत्रे अपंग एकात्म शिक्षण कक्षाकडून परिषदेच्या अ.वि.वि. व मूल्यमापन कक्षाकडे वर्ग करण्यात आली. या विषयाबाबतची कार्यवाही त्या कक्षांमार्फतच करण्यात आली असे दिसून येते. नस्ती व पत्रव्यवहार अप्राप्त आहे.

त्यानंतर २१/३/२००० रोजी मा. सचिव, शालेय शिक्षण यांचे अध्यक्षतेखाली सदर विषयावर बैठक झाली. त्यामध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने ज्या सवलती डिस्लेक्सियाच्या मुलांना दिल्या आहेत त्या ९ वी व १० वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी दिल्या आहेत. अगदी त्याच धर्तीवर प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने ही १९९६-९७ मध्ये दिल्या आहेत. तथापि त्या शाळांकडे उपलब्ध नाहीत. म्हणून सर्व प्राथमिक शाळांना परत सूचना देण्याचे निश्चित करण्यात आले. तथापि अशा सूचना परिषदेने दिल्या नाहीत. व शाळांकडे व्यापक प्रमाणात उपलब्ध नाहीत.

या विषयासाठी शासनाने मा. सचिव शालेय शिक्षण (महाराष्ट्र राज्य) यांच्या अध्यक्षतेखाली १६ जानेवारी २००१ रोजी समिती गठीत केली. त्या समितीची बैठक दि. ३०/८/२००४ रोजी झाली. समितीमध्ये शिक्षण संचालक प्राथमिक/ माध्यमिक व उच्च माध्यमिक/ संचालक

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व प्रशिक्षण परिषद /सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे/ विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई व श्रीमती के.एस.दलाल सचिव, डिस्लेक्सिया सोसायटी, मुंबई यांचा समावेश आहे. आता समितीची बैठक २५ एप्रिल २००५ रोजी आहे. प्रामुख्याने मुंबई व पुणे विभागाच्या शहरी भागातून डिस्लेक्सिया सवलत मागणीचे प्रस्ताव येतात व मुंबई शहरातच त्याची प्रमाणपत्रे देण्याची व्यवस्था आहे. डिसेंबर अखेर वैद्यकीय प्रमाणपत्रे संबंधित विद्यार्थ्यांने पुरविणे अनिवार्य आहे. तसेच सार्वत्रिक परीक्षेसाठी आवेदनपत्र भरतेवेळीच सदरचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

सोबतः परिपत्रके व शासन निर्णय प्रती आहेत.



Note